# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/02/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा वार्ड नं. 15 कुही येथे दिनांक 14/02/2021 चे 21.00 वा. ते दिनांक 15/02/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक सुर्यभान कडव, वय 35 वर्ष, रा. वार्ड नं. 15 कुही हा आपला पानठेला बंद करून घरी गेला होता. फिर्यादी हा सकाळी पानठेला उघडण्याकरीता आला असता त्याला पाणठेल्याचे शटर उघडलेले दिसले. तसेच पानठेल्याचे शटरला लावलेले कुलुप तुटुन शटरच्या बाजुला पडलेले दिसले. रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने पानठेल्यामध्ये असलेले वेग–वेगळया कंपनीचे सिगरेटचे पॉकीट कि. 11,585/–रू., नगदी 300/–रू. व इतर उपयुक्त साहित्य असा एकुण किमती 15,265/– रू. चा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 461 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुजारी 8956763319 हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. खापरखेडा :– दि. 15/02/2021 चे 00:15 वा. ते 00.20 वा. चे सुमारास फिर्यादी हे आपले पत्नी बहिण व तीन मुलींसह ब्रिक्स बिना येथे मजूर म्हणून काम करीत होते. फिर्यादींच्या दोन मुली व बहिण या लेबर कॅम्प मध्ये बाजुच्या रूममध्ये झोपलेले असतांना आरोपी क्र. 1) फत्तू नरसिम्हा, वय 40 वर्ष रा. तह. जुन्नारदेव. पो.स्टे दमूहा जि. छिंदवाडा (मध्यप्रदेश) ह.मु. नॅशनल ब्रिक्स रोड गायघाट रामपुर जिल्हा छिंदवाडा याने फिर्यादींची लहान मुलगी वय 15 वर्ष हीचे जवळ येउन तीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पिडीत मुलगी ओरडल्याने फिर्यादीस जाग येवून त्यांनी आरोपीस पकडून दोन थापडा मारल्या असता आरोपी क्र. 1. व त्याचा भाचा आरेपी क्र. 2) सुनिल अंदाजे वय 35 वर्ष हा तेथे येवून दोघांनी मिळून फिर्यादीस मारहाण केल्याने फिर्यादीचे डावे हातास किरकोळ जखम झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323 भादंवि. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि पाटील मॅडम पो.स्टे. कन्हान या करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– दि. 14/02/2021 चे 16:30 वा. चे सुमारास आरोपी नामे– अतुल गुणवंत भोयर, वय 28 वर्ष, रा. इंटनगोटी ह.मु. पाटणसांवगी याने पीडित/फिर्यादी वय 24 वर्ष हिला अश्लिल शेरेबाजी करून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेला " मी तुझा व तुझ्या मामाचा मर्डर करणार" अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (ड), 506 भादंवि. कायद्यन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निशांत फुलेकर मो. क्र. 7588564300 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर